24 DEC 2024
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पन्हाळगडावर ताराराणींचा अश्वारूढ पुतळा उभारणार

## आ. डॉ. विनय कोरे : मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई विद्वत परिषदेची सांगता

**पन्हाळा : पुढारी वृत्तसेवा**

पन्हाळगडावर महाराणी ताराबाई यांचा अश्वारूढ पुतळा व त्यांच्या जीवनावर आधारित चित्रदालन उभारणार असल्याची घोषणा शाहूवाडी-पन्हाळ्याचे आमदार डॉ. विनय कोरे यांनी केली. राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंतीनिमित्त आयोजित दोन दिवसीय मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई विद्वत परिषदेच्या सांगता समारंभात ते बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. परिषदेत दुसऱ्या दिवशी सकाळी हेरिटेज वॉक झाला. इतिहास अभ्यासक अमित अडसुळे यांनी सुमारे दोनशे विद्यार्थी व इतिहासप्रेमींना पन्हाळगडावरील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक स्थळांची माहिती दिली. यानंतर शाहीर




**पन्हाळा : येथे मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई विद्वत परिषदेच्या सांगता समारंभात बोलताना आमदार डॉ. विनय कोरे. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, चेतनकुमार माळी, विजय पाटील, रवींद्र धडेल आदी.**

दिलीप सावंत व तृप्ती सावंत यांनी पोवाडा सादर केला.

इतिहास अभ्यासक राम यादव यांचे व्याख्यान झाले. डॉ. पूनम पाटील-भुयेकर यांनी 'राजमाता जिजाऊंचा वारसा व ताराबाईंचे योगदान' या विषयावर भाष्य केले, तर डॉ. देविकाराणी पाटील यांनीही विचार मांडले. स्वप्नजा घाटगे यांनी 'महिला सक्षमीकरण व महाराणी ताराबाई' या विषयावर मार्गदर्शन केले.

आ. डॉ. विनय कोरे यांनी अध्यक्षीय भाषणात पन्हाळगडावर ताराबाईंचा पुतळा उभारण्याची मागणी मान्य केल्याचे जाहीर केले व त्या संदर्भात प्रशासनाला सूचना दिल्या. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या वतीने महाराणी ताराबाई यांच्यावरील संशोधनाची माहिती दिली.

परिषदेचे संयोजक किरणसिंह चव्हाण यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन अमोल काशीद यांनी केले. अमित अडसुळे यांनी आभार मानले.

### संग्रहालय दालनाची गरज

इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी महाराणी ताराबाईंच्या पराक्रमाची ओघवती मांडणी केली. त्यांनी पन्हाळगडावर ताराबाईंच्या विस्मृतीत गेलेल्या इतिहासाचा गौरव करण्यासाठी संग्रहालय दालनाची गरज अधोरेखित केली.

24 DEC 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराणी ताराबाईंचा पुतळा उभारणार

## आमदार डॉ. विनय कोरे : मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई विद्वत परिषदेची सांगता

■ सकाळ वृत्तसेवा

पन्हाळा, ता. २३ : 'पन्हाळगडावर रणरागिणी, मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई यांचा अश्वारूढ पुतळा व चित्र दालन उभारणार असल्याचे आमदार डॉ. विनय कोरे यांनी सांगितले. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे पन्हाळगडावर महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जन्म वर्षानिमित्त आयोजित दोन दिवस चाललेल्या मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई विद्वत परिषदेच्या सांगता समारंभात ते बोलत होते.

परिषदेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात सकाळी 'हेरिटेज वॉक'ने झाली. यावेळी अभ्यासक अमित अडसूळ यांनी सुमारे २०० विद्यार्थी व सहभागी इतिहासप्रेमींना पन्हाळगडावरील महत्त्वपूर्ण ठिकाणांचा इतिहास व परिपूर्ण माहिती दिली, तर शाहीर दिलीप सावंत, तृप्ती सावंत आणि सहकाऱ्यांनी पोवाडा सादर केला.




पन्हाळा : परिषदेत बोलताना आमदार डॉ. विनय कोरे. व्यासपीठावर उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, किरणसिंह चव्हाण, इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत व मान्यवर.

आमदार डॉ. कोरे म्हणाले, 'साडेतीनशे वर्षांपूर्वी जन्म झालेल्या एका पराक्रमी रणरागिणीने छत्रपती म्हणून सिद्ध करत असताना राजघराण्यातील स्त्रीचे आयुष्य कसे असावे हे दाखवून दिले. प्रचंड मोठ्या संकटाला धीराने सामोरे जाऊन इतिहास बदलण्याचे काम केले. ते मूर्तिमंत पर्व ज्या पावनभूमीत झाले, त्या पन्हाळगडावरील त्यांच्या वाड्यात हा कार्यक्रम होतो आहे. ताराबाईंचा इतिहास हा केवळ कोल्हापूर व सातारा संस्थान किंवा महाराष्ट्रापुरता मर्यादित राहत नाही. त्यांचा 'मोगलमर्दिनी' हा किताब त्यांनी कर्नाटक, तेलंगणा ते दिल्लीपर्यंत कूच करण्याच्या मार्गातील संघर्षाच्या इतिहासाचा आहे. त्यामुळेच महाराणी ताराबाई यांच्या इतिहासाला जगासमोर आणण्यासाठी संग्रहालय दालनाची गरज आहे.'

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठामार्फत महाराणी ताराबाई यांच्यावर आजपर्यंत झालेल्या संशोधनाची माहिती दिली. इतिहास अभ्यासक राम यादव, डॉ. पूनम पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, इतिहास संशोधक स्वप्नजा घाटगे यांची व्याख्याने झाली. यावेळी मुख्याधिकारी चेतनकुमार माळी, माजी नगराध्यक्ष विजया पाटील, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र धडेल, माजी नगरसेवक रवींद्र तोरसे, माधव गुळवणी, जीवन पाटील व इतिहासप्रेमी उपस्थित होते. परिषदेचे संयोजक किरणसिंह चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अमोल काशीद यांनी केले.

**विद्यापीठामार्फत लवकरच विद्वत परिषद**

'छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या इतिहासाची समग्र माहिती असलेले पुस्तक व व्यापक विद्वत परिषद शिवाजी विद्यापीठामार्फत लवकरच घेणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी यावेळी जाहीर केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2024
लोकमत

# विद्यापीठातर्फे 'वाचन संकल्प' अभियान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यापीठांमध्ये तसेच विविध महाविद्यालयांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी तसेच विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी, त्यांच्या ज्ञानात भर पडावी या अनुषंगाने प्रयत्न केले जाणार आहेत. या अभियानांतर्गत पुस्तकांचे सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजन, ग्रंथ प्रदर्शन, वाचन संवाद कार्यक्रमांतर्गत लेखकांचा वाचकांशी संवाद आदी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यावेळी निबंध स्पर्धा तसेच कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या उपक्रमापूर्वी सर्व ग्रंथालयांमध्ये स्वच्छता मोहीमही राबवण्यात येणार असल्याची माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2024
सकाळ

# नव्या वर्षात विद्यापीठात 'वाचन संकल्प' अभियान

कोल्हापूर, ता. २३ : राज्य शासनाच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठात एक ते १५ जानेवारीदरम्यान 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम राबविण्यात येणार आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी. त्यांच्या ज्ञानात भर पडावी, या अनुषंगाने हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत पुस्तकांचे सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजन, ग्रंथ प्रदर्शन, वाचन संवाद कार्यक्रमांतर्गत लेखकांचा वाचकांशी संवाद आदी उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2024
पुढारी

# १ जानेवारीपासून वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात १ ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. पुस्तकांचे सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, ग्रंथ प्रदर्शन, वाचन संवाद कार्यक्रमांतर्गत लेखकांचा वाचकांशी संवाद उपक्रम घेतले जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकावर आधारित निबंध स्पर्धा तसेच कथन स्पर्धेचे आयोजन केले आहे. उपक्रमापूर्वी सर्व ग्रंथालयांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ २६ जानेवारी रोजी विद्यापीठात होणार आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2024

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात १ जानेवारीपासून 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठात १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यापीठामध्ये तसेच विविध महाविद्यालयांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी . विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी, त्यांच्या ज्ञानात भर पडावी या अनुषंगाने हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पुस्तकांचे सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजन, ग्रंथ प्रदर्शन, वाचन संवाद कार्यक्रमांतर्गत लेखकांचा वाचकांशी संवाद इत्यादी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकावर आधारित निबंध स्पर्धा तसेच कथन स्पर्धेचे आयोजन केले आहे.

24 DEC 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्तनाच्या कर्करोगावर चुंबकीय नॅनो कणांद्वारे उपचार

## डॉ. गजानन राशीनकर, डॉ. प्रज्ञा पाटील यांचे संशोधन : प्रयोग यशस्वी झाल्यानंतर औषध बाजापेठेत आणण्याची प्रक्रिया

प्रतिनिधी
कोल्हापूर

महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक आहे. यावर विविध उपचार पद्धती उपलब्ध आहेत. यात भर घालण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. गजानन राशीनकर आणि डॉ. प्रज्ञा पाटील यांनी स्तनाच्या कर्करोगावरील हाइपरथर्मिया उपचारांसाठी चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती केली आहे. नॅनो कणांव्दारे स्तनाचा कर्करोग मुळापासून नष्ट करण्यास मदत होणार आहे. संशोधनाचा दर्जा पाहूनच या संशोधनाला भारतीय व आंतरराष्ट्रीय युकेचे पेटंटही प्राप्त झाले आहे. आता पुढील प्रक्रिया म्हणून लॅबमध्ये नॅनो कणांचा प्रयोग उंदरावर करून तो यशस्वी झाल्यानंतर हे औषध बाजापेठेत आणण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे.

विशेषतः महिलांमध्ये मुखातील कर्करोगप्रमाणेच स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाणही झपाट्याने वाढत आहे. वेळीच उपचार केल्यास या रूग्णांना किमान पुढे १० ते २० वर्षे आयुष्य जगता येते. परंतु पुढे जाऊन पुन्हा कर्करोगाच्या पेशी तयार होतात आणि पुन्हा रूग्णांना कर्करोगाचा सामना करावा लागतो. त्यामुळे महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाच्या पेशीच नष्ट करण्यासाठी डॉ गजानन राशीनकर, डॉ. पद्मा पाटील यांनी नॅनो-मॅग्नेटाईटच्या अतिसूक्ष्म रेणूवर विविध रासायनिक अभिक्रिया करून त्यावर एन-हेटेरोसायक्लिक कार्बनचे (एन.एच.सी.) आवरण चढवले. त्याची सोने या धातूसोबत प्रक्रिया करून या चुंबकीय नॅनो कणांची निर्मिती केली आहे.

### दहा वर्षाच्या श्रमाला यश

महिलांमधील स्तनांच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी शरीरात होणाऱ्या कर्करोगाच्या पेशीच मुळापासून संपवण्यासाठी १० वर्षापासून संशोधन करीत होतो. या अनंत अडचणींचा सामनाही करावा लागला. परंतु अडचणींवर मात करत संशोधन यशस्वी करून पेटंटसाठी प्रस्ताव पाठवला. या संशोधनाला भारतीय तसेच युके अशी दोन पेटंट मिळाली आहेत. त्यामुळे दहा वर्षाच्या श्रमाला यश आल्याचा आनंद आहे. पुढील प्रक्रिया लवकरच केली जाणार आहे.

– डॉ. गजानन राशीनकर,
रसायनशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ



### उंदरांवर प्रयोग केला जाणार

उंदरांमध्ये कॅन्सर निर्मिती करून त्यावर नॅनो कणांचा प्रयोग करण्यात येणार आहे. उंदरांवरील प्रयोग यशस्वी झाल्यास नॅनो कणांची प्री-क्लिनिकल चाचणी केली जाईल. त्यानंतर विद्यापीठातील इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजस केंद्रात या संशोधनाची नोंद केली जाईल. या केंद्रातून येणाऱ्या सुचनांचे पालन करून विविध औषध निर्माण कंपन्यांशी संपर्क साधून पुढील दिशा ठरवली जाणार आहे. त्यासाठीगतीने पुढील प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय संशोधकांनी घेतला आहे.

हे चुंबकीय नॅनो कण कर्करोगावरील हाइपरथर्मिया उपचार पद्धतीमध्ये अतिशय प्रभावीपणे वापरले जाणार आहेत. चुंबकीय नॅनो कणांच्या विशिष्ट संरचनेमुळे ते स्तनाच्या कर्करोगकारक पेशींना जोडले जातात. अशा जोडल्या गेलेल्या नॅनो कणांवर जेव्हा चुंबकीय बल टाकले जाते; तेव्हा सतत बदलत जाणाऱ्या चुंबकीय लहरींच्या प्रभावामुळे हे कण उष्णता उत्सर्जित करतात. या प्रक्रियेदरम्यान साधारणपणे ४० ते ४८ अंश सेंटीग्रेड इतके तापमान निर्माण होते. त्यामुळे कर्करोगांच्या पेशींची अंतर्गत रचना ढासळते आणि त्या नष्ट होतात. हे नॅनोकण कर्करोगाच्या गाठीला रक्तपुरवठा करणाऱ्या विविध रक्तवाहिन्यांची वाढ थांबवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. या प्रक्रियेदरम्यान इतर पेशींना अपाय न करता स्तनाच्या कर्करोगांच्या पेशी नष्ट करण्याकरिता या नॅनो कणांचा प्रभावी उपयोग होतो. हे संशोधन एन-हेटेरोसायक्लिक कार्बिन आणि मूलभूत धातूंपासून नवनवीन नॅनो कणांची निर्मिती करणाऱ्या संशोधन क्षेत्राला दिशादर्शक ठरणार आहे.

24 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आविष्कार स्पर्धेत कॉलेज ऑफ फार्मसीचे यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात विद्यापीठ स्तरीय पदवी, पदव्युत्तर व संशोधन आविष्कार संशोधन स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीच्या श्रुती किल्लेदारने मेडीसीन अँन्ड फार्मसी विभागात प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेततील यशस्वी विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक.**

आविष्कार स्पर्धेत तृतीय क्रमांक रितीका कोंडूसकर (कृषी आणि प्राणी संशोधन), पदव्युत्तर विभाग व्दीतीय क्रमांक प्रसाद कोळी व चौथा क्रमांक पुजा पुजारी (मेडीसीन अँन्ड फार्मसी), तृतीय क्रमांक ज्ञानेश्वर माने ( कृषी आणि प्राणी संशोधन),चौथा क्रमांक क्रांती देशमुख (इंजिनिअरींग अँन्ड टेक्नॉलॉजी), व तसेच संशोधन विभाग तृतीय क्रमांक ललीता धैयवडे (कृषी आणि प्राणी संशोधन)प्रथम कमांक ऋतुजा चौगले. मुख्यसमन्वयक म्हणून डॉ. डी. टी. गायकवाड व डॉ. एफ. ए. तांबोळी यांनी काम पाहीले. प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया, डॉ. डी. टी. गायकवाड, डॉ. एफ. ए. तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेचे ८७ निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे आजअखेर ८७ निकाल घोषित झाले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सोमवारी बीए., बी.कॉम., बीएस्सी., एमए., एम.कॉम., एमबीए, एम.एस्सी., बीबीए, बीसीए, एमसीए, बी.ए. बीएड., बी.टेक., एलएलबी, बीएसडब्ल्यू आदी १२६ अभ्यासक्रमांच्या १९६ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या.

परीक्षेला ३९ हजार १८९ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. २३ रोजी बी.टेक., बी.आर्किटेक्ट, बी.व्होक इन अॅग्रीक्चलर, बी.व्होक इन नर्सिंग, बी.व्होक प्रिंटिंग अँड पब्लिशिंग, व्ही.बी.आय.डी. आदी ३१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. परीक्षेवेळी भरारी पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून (०२), सांगली (०८) व सातारा (०१) असे ११ गैरप्रकाराची नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 DEC 2024
तरुण भारत

# नेटबॉल स्पर्धेत कमला कॉलेजला जेतेपद

## आजपासून सुरु होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेत करणार प्रतिनिधीत्व



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विभागीय मुलींच्या नेटबॉल स्पर्धेत विजेतेपद मिळवलेल्या कमला कॉलेजच्या संघासोबत ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. निता धुमाळ, ज्योती लेंगरे, पूजा ठाकूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विभागीय मुलींच्या नेटबॉल स्पर्धेत कोल्हापुरातील कमला कॉलेजने बहारदार खेळ करत विजेतेपदाला गवसणी घातली. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कमला कॉलेजने जयसिंगपूरातील कन्या महाविद्यालयाला ५–० गुणफरकाने पराभूत करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. शिवाजी विद्यापीठातील मैदानात ही स्पर्धा झाली.

पहिला सामन्यात कमला कॉलेज संघाला पुढे चाल मिळाली होती. त्यामुळे कमला कॉलेजचा थेट उपांत्य फेरीत प्रवेश झाला. या फेरीतील सामन्यात कमला कॉलेजने आजरा महाविद्यालयाला (आजरा) ४–१ ने पराभूत करत अंतिम फेरीत धडक दिली. अंतिम फेरीतही कमला कॉलेजने कन्या महाविद्यालयाला सहज पराभूत करत शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मुलींच्या नेटबॉल स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली. दरम्यान, शिवाजी विद्यापीठातील मैदानातच मंगळवार दि. २४ रोजीपासून आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत कमला कॉलेजचा संघ प्रतिनिधीत्व करणार आहे. या संघाला प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. निता धुमाळ, शारीरिक शिक्षण संचालक ज्योती लेंगरे, प्रशिक्षक रघू पाटील, पूजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

स्पर्धा विजेता कमला कॉलेजचा संघ : सना मुल्ला (कर्णधार), श्रुती लककुटकी, मानसी वासुदेव, स्नेहल बागणे, सृष्टी देसाई, प्रज्वली चौगुले, दिया माने, दिक्षा कांबळे, सादिया शेख.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 DEC 2024
तरुण भारत

# आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत अनुष्का, धैर्यशीलचे यश

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेतील विविध प्रकारात कोल्हापुरातील अनुष्का व धैर्यशील किरण भोसले या दोघा सख्ख्या बहिण-भावाने कौतुकास्पद कामगिरी करत पहिल्या सोळा यशस्वी जलतरणपटूंच्या यादीत स्थान मिळवले. चेन्नईतील एसआरएम इन्स्टिट्यूटमधील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जलतरण तलावात ही स्पर्धा झाली. दोघांनीही शिवाजी विद्यापीठातर्फे स्पर्धेत प्रनितिधीत्व केले होते.

स्पर्धेच्या ४ बाय २०० मीटर फ्रिस्टाईल रिले या प्रकारात अनुष्काचा सहभाग असलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाने चौथा क्रमाक मिळवला. तसेच धैर्यशीलने २०० व ४०० मीटर वैयक्तिक मिडले प्रकारात अनुक्रमे १३ वा आणि १४ वा क्रमांक, ४०० मीटर फ्रिस्टाईलमध्ये १६ वा क्रमांक मिळवला. याचबरोबर धैर्यशीलचा सहभाग असलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाने ४ बाय १०० मीटर मिडले रिलेमध्ये ८ वा, ४ बाय २०० मीटर फ्रिस्टाईल रिलेमध्ये १३ वा, ४ बाय १०० मीटर मिक्स फ्रिस्टाईलमध्ये १२ वा आणि ४ बाय १०० मीटर मिक्स मिडले रिलेमध्ये ९ वा क्रमांक मिळवला.


अनुष्का भोसले


धैर्यशील भोसले

- **चेन्नईत होणाऱ्या अ. भा. आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत करणार प्रतिनिधीत्व**

स्पर्धेतील कामगिरीची दखल घेऊन अनुष्का व धैर्यशीलची चेन्नईतील एसआरएम इन्स्टिट्यूटमधील जलतरण तलावातच २५ ते २७ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. धैर्यशील हा डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलिजीमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. तसेच अनुष्का ही शिवाजी विद्यापीठात एम.एस्सी करत आहे. या दोघांनाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्रशिक्षक प्रभाकर डांगे, प्रा. पी. डी. पाटील, प्रा. शरद नलवडे, प्रा. सुनील खराडे, प्रा. महेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.